Indian Streams Research Journal
Volume 3, Issue.1,Feb. 2013
**ISSN:-2230-7850**

Available online at www.isrj.net

**ORIGINAL ARTICLE**

# *वारकरी संप्रदायाच्या आचार–विचार प्रणालीची सुत्रे*

***लक्ष्मण भिकाजी कोठावळे***

एम्.ए., एम्.फिल्. (मराठी)
श्रीढोकेश्वरकॉलेज, टाकळीढोकेश्वर, ता.पारनेर, जि.अहमदनगर

***सारांश***

ज्या आचार धर्मामुळे संप्रदायास वारकरी असेनाव पडलेतो प्रमुख आचार धर्मवारी. इतर कोणत्याही पूर्वकालीन, समकालीन आणि उत्तरकालीन संप्रदायात हा आचार धर्मनाही. आधुनिक महाराष्ट्राच्या उभारणीत संतांच्या वारकरी संप्रदायाचे योगदान मोठे आहे.

***प्रस्तावना***

वारकरी संप्रदायाच्या आचार विचार प्रणालीची सुत्रे भाविकांच्या नजरे समोर आणून देण्यासाठी हा लेख प्रपंच आहे.

1.संप्रदायाचेनाव– वारकरी –वारीहा या संप्रदायाचा प्राण आहे. जो पंढरपूरच्या विठ्ठलाची गळयात तुळशी माळा धारण करुन, खांद्यावर भगवी पताका घेऊन कपाळाला गंध लावून, मुखानेराम कृष्णहरिहा मंत्र म्हणत आशाढी एकादशीला पंढरपूरची व कार्तिकी एकादशीला आळंदीची पायीवारी करतो तो वारकरी. या संप्रदायाला भागवत, माळकरी असे ही म्हणतात. या पंढरीच्यावारीचे महत्व विषद करताना संत तुकाराममहाराज म्हणतात.

पंढरीचीवारीआहेमाझे घरी । आणिक न करीतीर्थव्रत ।।1।।
व्रत एकादशीकरीनउपवाशी । गाईनअहर्निशीमुखीनाम ।।2।।
नामविठोबाचे घेईन मी वाचे । बीजकल्पांतीचेतुकाम्हणे ।।3।।

2.आद्य प्रवर्तक–पुंडलिक–वारकरी भक्ता माजी ।पुंडलिक महामुनी ।। असे संत जनाबाईचे प्रमाण आहे. आई–वडिलांचीसेवाहेच खरेतीर्थक्षेत्र आहे. असे कुक्कट स्वामींनी पुंडलिकाला सांगितले. मग पुंडलिकाने आई–वडिलांची सेवा केली. ही सेवा पाहून परब्रम्हपुंडलिका समोर विठ्ठलाच्या रुपाने प्रकट झाले. त्या विठ्ठलाला पुंडलिकाने भक्तांना दर्शन देण्यासाठी विटेवर उभे केले अशी कथा पद्मपुराणात आहे. म्हणून या संप्रदायाचा आद्य प्रवर्तक पुंडलिक ठरतो.

3.संस्थापक– संत ज्ञानेश्वर– संत ज्ञानदेवा पूर्वीसुरु असलेल्या वारकरी संप्रदायाची मुहूर्त मेढ ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरी ग्रंथाच्या रुपाने इ.स. 1290 मध्ये नेवासे येथेरोवली. म्हणूनच ज्ञानदेवेरचिलापाया या संत बहिणाबाईंच्या उक्तीनुसार या संप्रदायाचे संस्थापक म्हणून ज्ञानदेवांचे योगदान किती मोठे आहे हे आपल्या लक्षात येते.

4.धर्ममुद्रा–श्रीविठ्ठल– संत तुकारामांनी विठ्ठलाला धर्माची तू मूर्ती असे म्हटले आहे. म्हणून संप्रदायाची मुद्रा श्री विठ्ठल आहे.

5.देवता–श्रीविठ्ठल–

पंढरीनगरीदैवतश्रीहरी । जाती वारकरी नित्य निमे ।।1।।

असे संत नरहरी सोनारांचे प्रमाण आहे. संत वाड्.मयाचे अभ्यासक डॉ. र.चिं.ढेरे यांनी श्री विठ्ठल महासमन्वयाचे प्रतीक आहे असे म्हटले आहे. म्हणून या संप्रदायाची देवता श्री विठ्ठल आहे.

6.कुलाचार–श्री विठ्ठलाचे नामस्मरण–ज्या प्रमाणे महाराष्ट्राचे कुलदैवत जेजूरी चाम्हाळ साकांत खंडेराय त्याच प्रमाणे महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाचे आराध्यदैवत पंढरीचा श्रीविठ्ठल आहे. हा विठ्ठलबरवा आहे. त्याचप्रमाणे सर्वसुखाचे आगर आहे. म्हणून त्याचे नामस्मरण करणे हा या संप्रदायाचा सर्वश्रेष्ठ कुलाचार आहे.

7.बीजमंत्र –रामकृष्ण हरि हा संप्रदायाचा बीजमंत्र आहे. संत तुकारामांना त्यांचे गुरु बाबाजी यांनी हा मंत्र स्वप्ना मध्ये सांगितला आहे.

बाबाजीआपुलेसांगितलेनाम । मंत्र दिलारामकृष्णहरि ।।

**Title :** *वारकरी संप्रदायाच्या आचार–विचार प्रणालीची सुत्रे*
**Source:Indian Streams Research Journal [2230-7850]** *लक्ष्मण भिकाजी कोठावळे* **yr:2013 vol:3 iss:1**

संप्रदायाच्याभजन, कीर्तन, प्रवचन या कार्यक्रमांची सुरुवातराम कृष्णहरि या मंत्रानेहोते. तुळशी माळ जपताना प्रत्येक वारकरी हा मंत्र म्हणतो.

8.भाशा–संप्रदायाची भाषा मराठीआहे.

माझा मराठाचिबोलूकौतुके ।परिअमृतातेहीपैजासीजिंके ।।
ऐसी अक्षरेरसिके ।मेळवीन ।। (ज्ञा.6–14)

असामराठी भाषेचा स्वाभिमान संत ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरी ग्रंथात व्यक्त केला आहे. मराठी भाषा आणि संस्कृती समृध्द करण्याचे काम वारकरी संप्रदायाने केले आहे.

9.ग्रंथ–ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत आणि संत तुकारामांची अभंग गाथा हे या संप्रदायाचे प्रमाणभूत ग्रंथ आहेत. याशिवाय श्रीसकलसंतगाथा या अभंग गाथेतील सर्व संतांचे अभंग वारकरी संप्रदाया मध्ये पूजनीय आहेत.

10. ध्वज–भगवीपताकाहा या संप्रदायाचा ध्वज आहे. भगवारंग अग्निचा असतो.

तृणअग्निमेळेसमासझाले ।तैसेनामेकेलेजपताहरी ।।
त्याप्रमाणे नाम स्मरणरुपी अग्निने शड्.विकारांचा त्याग होतो. म्हणून या संप्रदायाचा ध्वजभगवा आहे. भगवा ध्वज त्यागाचे ही प्रतीक आहे.

11.चरीधाम–संत निवृत्ती नाथांचे समाधी स्थान त्र्यंबकेश्वर, संत ज्ञानदेवांचे समाधीस्थान आळंदी, संत एकनाथांचे समाधीस्थान पैठण आणि संत तुकारामाचे वैकुंठगमनसीानदेहूही वारकरी संप्रदायाचीपवित्र चारीधाम क्षेत्रे आहेत.

12. घोषणा–पुंडलिक वरदाहरी विठ्ठल श्रीज्ञानदेवतुकाराम पंढरीनाथभगवान की जय ही या संप्रदायाची घोषणा आहे. या घोषणेने आषाढी एकादशीला पंढरपूर दुमदुमून जाते. या घोषणेचा सदैवगजर या संपद्रायात असतो.

13.घोषवाक्य–यारे यारेलहानथोर ।यातीभलतेनारीनर ।।
हे या संप्रदायाचे घोषवाक्य आहे. या संप्रदायामध्ये लहान जसा ज्येष्ठांचे चरण दर्शन घेतोतसेच ज्येष्ठ ही कनिष्ठांचे दर्शन घेतोहे या संप्रदायाचे आगळेवेगळे वैशिष्टय आहे.

14.ब्रीदवाक्य –विष्णूमय जगवैश्णवांचा धर्म ।भेदाभेदभ्रमअमंगळ ।।

हे या संप्रदायाचे ब्रीद वाक्य आहे. आज विज्ञानयुगामध्ये मानवाने प्रचंड प्रगती केली पण मना मधील भेद कायम आहे. धर्मा वरुन भांडणे होतात. मानव एकमेकांना श्रेष्ठ कनिष्ठ लेखत आहेत. या पार्श्वभूमीवर वारकरी संप्रदायाने असा भेदाभेद करणे अमंगल आहे असे म्हटले आहे. म्हणूनच या संप्रदायामध्ये विविध जातींमध्ये संत उदयाला आहे. त्यासर्वांनी मानवतेची शिकवण दिली.

15.तत्वज्ञान–चिव्दिला सवा दहे या संप्रदायाचे तत्वज्ञान आहे. माणसाने आसक्ती सोडावी आणि परमेश्वर सखा करावा. जेजे भेटेभूत ।तेतेमानिजेभगवंत ।हाभक्तियोगुनिश्चित ।जाणमाझा ।। (ज्ञा.10–118) हे या संप्रदायाचेतत्वज्ञानआहे.

16.स्नान संध्या –दररोज सकाळी आणि संध्याकाळी हरिपाठ म्हणणे ही या संप्रदायाची नित्य स्नान संध्या आहे.

हरिपाठकिर्तीमुखेजरीगाय ।पवित्रचीहोय देहत्याचा ।।1।।
देहाला व मनालापवित्र करण्याचेसामर्थ्यहरिपाठातआहे.
नित्यनेमनामीतो प्राणी दूर्लभ ।लक्ष्मीवल्लभतयाजवळी ।।1।।
म्हणूनहरिपाठम्हणजेवारकऱ्यांचीसंजीवनीआहे.

17.शिकवण–या संप्रदायाने कर्मयोगावर अधिकभर दिलेला आहे. प्रपंच आणि परमार्थ यांच्या समन्वयाची शिकवण या संप्रदायाने दिलेली आहे. थोडक्यात
जोडोनिया धन उत्तम व्यवहारे ।ही या संप्रदायाची शिकवण आहे.

18.कार्य–आम्हासापडलेवर्म ।करु भागवत धर्म ।।
हे या संप्रदायाचेकार्यआहे. यासाठीनाचुकीर्तनाचेरंगी ।ज्ञानदीपलावूजगी ।।
ही संत नामदेवांनीतरअवघाचीसंसारसुखाचाकरीन ।ही संत ज्ञानदेवांनी प्रतिज्ञा केलेली आहे.

19.माहेर–माझे माहेर पंढरी ।आहेभिवरेच्यातीरी ।।
भीमा नदीच्या तीरावर संतांचे माहेर पंढरपूर आहे. विठ्ठल आणि रुक्मिणी हेमाता–पिता आहेत. पुंडलिक बंधु आहे. बहीण चंद्रभागा आहे, असे संत एकनाथांनी माहेराचे वर्णन केलेले आहे.
आज जागतिकीकरणामुळे जगजवळ आलेले आहे, पणते अंतरंगाने नाही, बाह्यांगाने हेच जगअंतरंगाने आणि बाह्यांगाने जवळ येण्यासाठी हे विश्वची माझा घर या ज्ञानदेवांच्या वैश्विक विचारांची कृती झाल्यास विश्वाचा संसार सुफळ होण्यास वेळ लागणार नाही.

### *संदर्भग्रंथसूची*

1.इनामदारहे. वि. – संत नामदेव
2.इनामदारहे. वि. – संत एकनाथदर्शन

